
# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025



# बी. डी. सी., पाटण चा नाविन्यपूर्ण सीडबॉल उपक्रम

ग्रामोध्दार वृत्तसेवा

तारळे : येथील कोयना एज्युकेशन सोसायटी पाटण च्या पर्यावरण संवर्धन व रक्षण उपक्रमाच्या अंतर्गत सीडबॉल निर्मातीचा उपक्रम राबविण्यात आला.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली हा उपक्रम महाविद्यालयासह संस्थेच्या इतर विद्यालयात देखील राबविण्यात येत आहे.

बी. डी. सी. कॉलेज मधील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यात पाटण तालुक्यातील दुर्मिळ आणि वनऔषधी यांच्या बियांची साठवणूक करण्यात आली होती.

त्या बियांचे ५०० सिडबॉल निर्माण करण्यात आले. या उपक्रमशील उपक्रमात प्रा. टी आय. पाटणकर, प्रा. सुमित लाड, प्रा. झुळझुळे पी. जी., प्रा. भोसले एस. डी. यांनी विशेष परिश्रम घेतले. हे तयार करण्यात आलेले सिडबॉल पाटण परिसरातील डोंगर परिसरात रूजविण्यात येणार आहेत. त्यामुळे पाटणची निसर्गसंपदा व वृक्षसंपदेची नक्कीच भरभराट होईल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार व पर्यवेक्षक डी. बी. दाभाडे हे उपस्थित होते.